राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये
प्राप्त झालेली तक्रार
तक्रार क्रमांक : ३१/२०१९

तक्रारकर्ता, श्री.रामचंद्र भिवसन सिरसाट,
व्दारा, प्रमोद रामचंद्र सिरसाट, कृषी नगर, जलंब रोड, वाडी,
खामगाव, ता.खामगाव, जि.बुलडाणा
विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, शेगाव, ता.शेगाव, जि.बुलडाणा

प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार,
तहसिल कार्यालय, शेगाव, ता.शेगाव, जि.बुलडाणा

तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : २५.०९.२०२३

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित (प्रतिनिधी) |
| जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्जाचा दिनांक |
|---|---|---|
| ०६.०८.२०१८ | -- | ०५.०३.२०१९ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र.३७८०/२०१५ दि.०६.०८.२०१८ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारीवर दिनांक २५.०९.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता यांचे प्रतिनिधी श्री.प्रमोद रामचंद्र सिरसाट हे उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.कल्याण काळदाते व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी श्री.समाधान सोनवणे हे उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील (अपील क्र.३७८०/२०१५) मध्ये दिनांक ०६.०८.२०१८ रोजी सुनावणी घेवून " १.अपिलार्थीस अद्यापही माहिती देण्यात आली नसल्यामुळे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जोडपत्र अ नुसार मागितलेली माहिती नोंदणीकृत डाकेने विनाशुल्क पुरवावी व तसा अनुपालन अहवाल

आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासुन ३० दिवसाच्या मुदतीत आयोगास सादर करावा. २. माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ७(१) नुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.एस.झेड.पवार व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.दि.ल.मुकूंदे यांनी ३० दिवसाच्या विहित मुदतीत उपलब्ध व देय ठरत असलेल्या माहितीचे अपिलार्थीस प्रदान केले नाही म्हणुन त्यांना कलम २०(१) नुसार प्रत्येकी रु.५०००/- (रुपये पाच हजार फक्त) एवढी शास्ती करण्यात येते. ३. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर निर्णयाची प्रत नोंदणीकृत डाकेने संबंधित जन माहिती अधिकारी यांना पाठवावी. तसेच त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांचे मासीक वेतनातुन उपरोक्त शास्तीची रक्कम एकमुस्तपणे विहीत पध्दतीने वसुल करुन माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या संबंधित लेखाशिर्षामध्ये चलानव्दारे जमा करावी व चलानच्या प्रतीसह अनुपालन अहवाल आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासुन ३० दिवसाच्या मुदतीत आयोगास सादर करावा." असे आदेश पारित केले होते.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेला खुलासा व तक्रारकर्ता यांचे युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, तक्रारकर्ता श्री.सिरसाट यांचे द्वितीय अपील क्र. ३७८०/२०१५ यात दि.०६.०८.२०१८ रोजी पारित केलेल्या आदेशात वरील प्रमाणे निर्देश देण्यात आले होते. मात्र पारित आदेशाची अमंलबजावणी झाली नसल्यामुळे तक्रारकर्ता श्री.सिरसाट यांनी दि.०५.०३.२०१९ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुत प्रकरणी आज झालेल्या सुनावणी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी शास्ती भरणा करण्याबाबत वेळोवेळी पाठपूरावा करुनही संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी शास्ती भरली किंवा कसे याबाबतचा कुठलाच तपशील कार्यालयीन अभिलेखावर उपलब्ध नसल्याचे नमूद केले आहे. तसेच तक्रारकर्ता यांना माहितीबाबत कुठलाच प्रतिसाद मिळाला नसल्याचे नमूद केलेले आहे. ही बाब अतिशय गंभीर असून प्रस्तुत प्रकरणी दि.०६.०८.२०१८ रोजी पारित ओदशात आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अंमलबजावणी होणे अपेक्षित असतांना तब्बल ५ वर्षाच्या कालावधी नंतर ही माहिती प्रदान न करणे व शास्तीचा भरणा न करणे हे दोन्ही बाबी अतिशय गंभीर असून तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.एस.झेड.पवार व श्री.दि.ल.मुकूंदे यांनी वरील आदेशाची अंमलबजावणी न केल्यामुळे त्यांचेविरुध्द कलम २०(१) अन्वये माहिती सादर करण्याबाबत झालेला विलंबाबात रु.२५०/- प्रतिदिवस इतकी शास्ती लादण्याबाबतची तरतुद विचारात घेता, वरील शास्तीची रक्कम अधिकतम रु.२५,०००/- का करण्यात येवू नये याबाबतचा खुलासा दोन आठवड्यात सादर करण्याची अंतिम संधी देण्यात येत आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, शेगांव यांना तक्रारकर्ता



राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय * अमरावती विभाग, अमरावती * सत्यमेव जयते

यांच्या दि.१४.०८.२०१५ रोजीच्या जोडपत्र-अ मधील विचारणा केलेल्या माहिती बाबत कलम २(च) नूसार अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती तात्काळ तक्रारकर्त्यास प्रदान करावी. तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार शेगांव, जि.बुलडाणा यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.एस.झेड.पवार व श्री.दि.ल.मुकुंदे हे ज्या प्राधिकरणा अंतर्गत राबत असतील तेथील विभाग प्रमूख यांचेशी संपर्क साधून प्रस्तुत आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत म्हणजेच त्यांचे वेतनातून याआधिच आदेशीत केलेले शास्तीची रक्कम वसूल करण्याबाबत कार्यवाही करण्याचे सूचीत करावे व ज्या कोषागारातून संबंधीत कर्मचाऱ्यांचे वेतन देयक पारित करण्यात येते तेथील कोषागार अधिकारी यांचेशी संपर्क साधून वरील आदेशाची तात्काळ अंमलबजावणी होईल, याबाबत पाऊल उचलावे. दरम्यान तक्रारकर्ता यांना माहिती प्रदान केल्याचा अनुपालन अहवाल विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी पुढील दोन आठवड्याच्या आत आयोगास सादर करावा.

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ अमरावती

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : २५.०९.२०२३**

जावक क्रमांक ६३१ दिनांक 06 FEB 2024